पोलीस आयुक्त,ठाणे शहर अंतर्गत

निजामपुरा पोलीस स्टेशन,भिवंडी जि.ठाणे

Email ID- cp.thane.nizampura@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्रमांक फोन ०२५२२-२५०२५०

दिनांक - ०२/०९/२०२६

प्रेस नोट

घरफोडी, वाहन चोरीतील सराईत गुन्हेगार जरीफ मेहबुब शेख,यास निजामपुरा पोलीसाकडुन अटक

निजामपुरा पोलीस स्टेशन परिसरांमध्ये गुन्हेगार वॉच, अवैध धंदे, चोरीच्या घटना, गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा व गुन्हे करणारे गुन्हेगांराना वेळीच जेरबंद करण्याबाबत मा. पोलीस उप आयुक्त श्री. पवन बनसोड, सो., परिमंडळ-२ भिवंडी व मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. मिलींद शिंदे, सो., पश्चिम विभाग भिवंडी यांनी परिमंडळातील प्रत्येक पोलीस ठाणेतील अधिकारी व अंमलदार यांना आपआपले पोलीस ठाणे हद्दीत सतर्क राहण्याबाबतचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार निजामपुरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे व पोलीस निरीक्षक समाधान पाटील (गुन्हे) यांच्या सुचना व व मार्गदर्शनाखाली सदर कारवाई केली आहे.

निजामपुरा पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी पोउपनि/शिवाजी पाटील, तसेच अंमलदार पोहवा/५०७७ कांबळे, पोना/२९३६ कोदे, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/३९१२ कोळी, पोशि/७९९९ पवार (खबर), पोशि/२२०६४ खंदारे यांनी दिनांक २५/०८/२०२६ रोजी सराईत आरोपी जरीफ मेहबुब शेख, वय २२ वर्ष, रा.इदगाह चाळ, सार्वजनीक शौच्यालयाच्या बाजुला, इदगाह रोड, भिवंडी जि. ठाणे, मो.क्र. ७२४९८८३८०९ यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे अधिक तपास केला असता आरोपीकडुन ०१ रिक्षा, ०२ मोटार सायकल व ०२ घरफोडीतील १०,०००/- रू रोख रक्कम व ०२ मोबाईल फोन हस्तगत केली आहे. आरोपीकडुन हस्तगत मालाबाबत खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

०१) १०,०००/- रूपये रोख रक्कम

(निजामपुरा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.८१४/२०२६ भा. न्या. सं. कलम ३०५, ३३१(४), ३(५) प्रमाणे)

०२) होंडा कंपनीची काळया रंगाची शाईन मोटारसायकल नंबर. MH-04-JX-5379

(निजामपुरा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ७७९/२०२५ भारतीय न्याय संहिता ३०३(२) प्रमाणे)

०३) बजाज कंपनीची काळया रंगाची, PALASAR 220 मोटारसायकल नंबर. MH04-JL3678,

(निजामपुरा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ८००/२०२५ भारतीय न्याय संहिता ३०३(२) प्रमाणे)

०४) विवो कंपनीचा व्हिओ १३ मोबाईल त्याचआयएमई ८६३७१८०६३२६६८५५/ ८६३७१८०६३२६६८४८

(निजामपुरा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ८१६/२०२६ भारतीय न्याय संहिता ३०५(अ),३३१(४),प्रमाणे)

०५) बजाज कंपनीची काळी पिवळया रंगाची ऑटो रिक्षा नंबर. MH-04-KA-7295

(निजामपुरा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ६४५/२०२६ भारतीय न्याय संहिता ३०३(२) प्रमाणे)

एकुण १,७७,०००/- रू. किमंतीचा मुददेमाल

सदर यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर श्री.आशुतोष डुंबरे सो., मा. पोलीस उप आयुक्त श्री. पवन बनसोड, सो., परिमंडळ-२ भिवंडी व मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. मिलींद शिंदे, सो., पश्चिम विभाग भिवंडी, मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, विश्वास डगळे सो, मा.पोनि. समाधान पाटील (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाने व निजामपुरा पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे पोउपनि/शिवाजी पाटील, तसेच अंमलदार पोहवा/५०७७ कांबळे, पोना/२९३६ कोदे, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/३९१२ कोळी, पोशि/७९९९ पवार (खबर), पोशि/२२०६४ खंदारे यांनी केलेली आहे.

